# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २९.०९.२०२६ मंगळवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २९.०९.२०२६ रोजी मा. २ रे जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ८२/२०२४ मधील, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील अप. क्र. ८८७/२०२३ कलम ३७६(अ)(ब) भा.दं.वि., सहकलम ४ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी सुरज सेवकराम बांधेकर, वय २७ वर्षे, रा. आंनद नगर, एनआयटी क्वॉर्टर, हनुमान मंदीर जवळ, यशोधरानगर, नागपुर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ६ पोक्सो कायद्यान्वये २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १२.१२.२०२३ चे १२.०० ते १२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत राहणाऱ्या ३७ वर्षीय फिर्यादी यांची अल्पवयीन पिडीत मुलगी ही पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील शिकत असलेल्या शाळेच्या बाथरुममध्ये नैसर्गिक विधीकरीता गेली असता, तेथे ती एकटी असल्याचा व अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन, वर नमुद आरोपीने तिचे ईच्छेविरूध्द तिचेसोबत आक्षेपाहर्य कृत्य केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक १२.१२.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी मसपोनि. श्रीमती मेघा गोखरे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती कल्पना पांडे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्रीमती सोनाली खोब्रागडे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोअं दिग्विजय वेरुळकर, मयुर लोहकरे व मपोअं नम्रता मेश्राम यांनी काम पाहिले.

**२) मा. पोलीस आयुक्तांचे अध्यक्षतेत, नागपूर शहर पोलीस पतसंस्थेची सर्वसाधारण वार्षिक सभा संपन्न :—**

नागपूर शहर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांचे आर्थिक हित दृष्टीने कार्यरत असलेल्या पोलीस पतसंस्थेची सर्वसाधारण वार्षिक सभा आज दिनांक २९.०९.२०२६ रोजी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेत उत्साहपुर्ण वातावरणात पार पडली. सभेदरम्यान पतसंस्थेतर्फे तयार करण्यात आलेले 'मोबाईल ॲप' चे मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले.

मा. पोलीस आयुक्त यांनी पोलीस पतसंस्थेच्या मागील आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा घेऊन, संस्थेच्या आर्थिक ताळेबंद तसेच, सभासदांकरीता राबविण्यात आलेल्या विविध योजना, कर्जविषयक बाबी आणि संस्थेच्या आगामी वाटचाली संदर्भात पतसंस्थेचे व्यवस्थापक यांचेशी सविस्तर चर्चा केली. तसेच, सभेदरम्यान सभासदांच्या हित संबंधीत विविध मुद्यांवर विचारविनीमय करुन, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेता, संस्थेने पारदर्शक, कार्यक्षम आणि सभासदाभिमुख पध्दतीने कामकाज करण्यावर भर द्यावा असे मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांना अधिकाअधिक पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्याचे दृष्टीने संस्थेने निर्माण केलेला मोबाईल ॲप नक्कीच उपयोगाचा ठरेल अशी आशा व्यक्त केली.

वार्षिक सभेदरम्यान मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, पोलीस पतसंस्थेचे पदसिध्द अध्यक्ष मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर तसेच, पतसंस्था व्यवस्थापक श्री. मनोज पाटणकर तथा पतसंस्थेचे सदस्य आणि पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने हजर होते.






**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ व सायबर पोलीसांची संयुक्तीक कामगीरी :— फसवणुक करणारे आंतरराज्यीय टोळीमधील ०७ आरोपींना अटक. १८,४५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त.**

फिर्यादी श्रीमती रुबिका खान पापा खान, वय ५० वर्षे, रा. शौकत अली चौक, हज हाऊस, गणेशपेठ, नागपूर यांना दिनांक १७.०९.२०२६ रोजी त्यांचे मोबाईल फोनवर एका अनोळखी ईसम आरोपीचा कॉल आला होता. तेव्हापासुन त्यांची ओळखी होऊन, त्यांचेमध्ये मैत्री झाली. फिर्यादीस आरोपीने त्याचा सोन्याचा व्यवसाय असुन, यु.के. येथे कपड्यांचा मॉल असल्याचे आणि त्याला भारतात येऊन लग्न करायचे आहे व स्थायीक व्हायचे आहे असे सांगुन, त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्याने फिर्यादीकरीता ७० तोळे सोने व ७०,००० युएस डॉलर भारतात घेऊन आला असुन, त्याला दिल्ली एअरपोर्ट येथे कस्टम विभागाने पकडले आहे व १३,९२,०००/—रू. भरणा करुन त्याने आणलेल्या मुद्देमालाची सुटका करणे आहे, असे फिर्यादीस खोटे सांगुन, त्यांचेकडून वारंवार वेगवेगळया पध्दतीने २० लाख रुपये घेऊन, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणुक केली. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ३१८(४) ३१९(२),२०४,३(५) भा.न्या.सं. सहकलम ६६(ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी सायबर सेलचे मदतीने तांत्रिक विश्लेषण करुन, आरोपी हा फिर्यादीची अधिक फसवणुक करण्याचे तयारीत असता, फिर्यादी यांचेसह सापळा रचुन, गुन्ह्यात सहभागी आरोपी १) जेयश अमृतजी ठाकुर, वय २० वर्ष, रा. चंद्रमाणा, ता. पाटण, गुजरात २) यशपाल आमसिंग चौहान, वय २४ वर्ष, रा. चंदाना, ता. वाव, जि. बनासकांठा, गुजरात ३) कुलदीपसिंग विक्रमजी जडेजा, वय २६ वर्ष, रा. पर, ता. सहातलपुर, जि. पाटण, गुजरात ४) राजेंद्रसिंग राणाजी वाघेला, वय ३४ वर्ष, रा. किडाना, ता. गांधीधाम, जि. कच्छ, गुजरात ५) नरपत बाबु सिंग, वय २७ वर्ष, रा. वातम, ता. दियोधर, जि. बनासकांठा, गुजरात ६) उपेंद्र नागजीभाई जोशी, वय २८ वर्ष, रा. ईसा, जि. बनासकांठा, गुजरात ७) भानुसिंग जशवतसिंग वाघेला, वय २९ वर्ष, रा. दियोधर, जि. वावथरात, गुजरात यांना ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी संगनमत करुन, वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली व ते नागपुर शहरातुन आंतरराष्ट्रीय रॅकेट चालवित असल्याबाबत सांगितले. तसेच, त्यांनी त्यांचा एक साथीदार मुंबई येथे असल्याचे सांगितल्याने, पोलीसांचे एक पथक मुंबई येथे रवाना करण्यात आले आहे. आरोपींचे ताब्यातुन रोख १५,०००/—रू., एक हॅरीअर कार, दोन दुचाकी वाहने, ०८ वेगवेगळे कंपनीचे मोबाईल

फोन असा एकुण १८,४५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यातील आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव गणेशपेठ पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. टोळीतील इतर सदस्यांचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि अमोल देशमुख, मधुकर काठोके, सफौ. ईश्वर खोरडे, संतोषसिंग ठाकुर, पोहवा. विजय श्रीवास, अजय पाटील, मनोज नेवारे, पोअं. जितेश रेड्डी, विवेक भोयर, दिपक लाकडे, दिपक दासरवार, चंद्रशेखर डेकाटे, प्रमोद देशभ्रतार, चापोहवा अनिल बोटरे, चापोअं विशाल रोकडे व मंगेश मेश्राम यांनी सायबर सेलचे पोउपनि विवेक झिंगरे व त्यांचे पथकाचे मदतीने केली आहे.



**<u>२) अजनी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या पाहीजे आरोपीस अटक. रू. २,७०,०००/— चा मुद्येमाल हस्तगत.</u>**

पोलीस ठाणे अजनी हद्दीत, रामेश्वरी, पार्वती नगर, प्लॉट क्र. ४२ येथे राहणारे फिर्यादी बापुराव सदाशिव कुंभारे, वय ९२ वर्षे यांचे घरी आरोपी आर्यन धिरज गायकवाड, वय १९ वर्ष हा भाडेकरु म्हणुन राहतो व तो नशापाणी करण्याचे सवईचा आहे. दिनांक १७.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, फिर्यादी हे त्यांचे घरी हजर असतांना, आरोपी हा त्याचे एक साथीदारासह आला व फिर्यादीस २०/—रू. मागितले. फिर्यादी यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने, आरोपी व त्याचे साथीदाराने संगनमत करुन, फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करुन, त्यांचेजवळील दोन सोन्याचे चैन वजनी २४ ग्राम व रोख ३,९००/—रू. असा एकुण ६३,९००/—रू. मुद्येमाल जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(६) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान अजनी पोलीसांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून गुन्ह्यातील दोन ईसमांपैकी ०१ विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न करून, विधीसंघर्षग्रस्त बालकास यापुर्वी ताब्यात घेण्यात आले होते. पाहीजे मुख्य आरोपीचा शोध सुरू होता. तपासादरम्यान आरोपी हा प्रांची, गुजरात येथे असल्याचे खात्रीशीर माहितीवरुन, अजनी पोलीसांचे पथकाने तेथे जाऊन आरोपी आर्यन धिरज गायकवाड वय १९ वर्षे, रा. रामबाग कॉलनी, मिलींद बुध्द विहारजवळ, इमामवाडा, नागपुर यास ताब्यात घेऊन, अटक

केली आहे. आरोपीचे ताब्यातुन सोन्याच्या दोन चैन वजनी २४ ग्राम किंमती २,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, (दक्षिण प्रभाग), नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोहवा. प्रविण खवसे, शालिकराम शेंडे, नितीनकुमार आडे, मपोअं वैशाली टापरे यांनी केली.



**३) भांडेवाडी पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या ०३ आरोपींना अटक. एकुण ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २०.०६.२०२६ चे ०८.३० वा. ते दिनांक २२.०६.२०२६ चे ११.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, प्लॉट नं. ६९, हनुमान नगर, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती उपासना सिध्दार्थ कानेकर, वय ३२ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे नंदेच्या मुलाचे अंत्यविधीकरीता वाडी येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी कपाटातील रोख ५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५०,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, भांडेवाडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले. आरोपींचा शोध घेऊन आरोपी १) आकाश उर्फ अक्षय प्रभुजी शेंडे, वय २६ वर्षे, रा. सागर किराणा दुकानाजवळ, एकता नगर, भांडेवाडी, नागपुर, २) रुपेश महेश यादव, वय २१ वर्षे, रा. छत्तीसगढ बॅकेंच्या मागे, डिप्टी सिग्नल, कळमणा, नागपुर, ३) शुभम उर्फ सुयोग उर्फ आंबा राकेश नेरकर, वय २३ वर्षे, रा. हनुमान नगर, भांडेवाडी, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतिरिक्त पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत ईतर ठिकाणी ०२ घरफोडी व ०१ वाहनचोरी, पोलीस ठाणे कळमणा हद्यीत ०२ वाहनचोरी असे एकुण ०६ घरफोडी व वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केल्याने, एकूण ०६ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचा रवा वजनी १५ ग्राम, चांदीच्या ०२ लगडी वजनी ४५० ग्राम, हिरो स्प्लेंडर क्र. एमएच ३१एफटी

८६५३, ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ बीडी ४७५० व ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ एक्स ७२५१ असा एकुण ३,७७,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री नितीन चरडे, पोउपनि. दीपक चालुरकर, पोहवा. अश्विन बडगे, सुनिल वानखेडे पोअं. मिलींद ठाकरे यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक. एकुण ०४ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १२.०८.२०२६ चे ०९.३० वा. ते दिनांक १३.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, प्लॉट नं. १२९४/२ए, सोनगबाजी नगर, जुना पारडी नाका, भंडारा रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी नवनित रामप्रसाद उईके, वय ३८ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे धार्मिक कार्यक्रमाकरीता रिधोरा, जि. वर्धा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी कपाटातील रोख ८,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व सॅमसंग कंपनीचा ०१ मोबाईल फोन असा एकुण किंमती ५०,९२०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले. आरोपींचा शोध घेऊन आरोपी १) निलम फैय्याज अन्सारी, वय २२ वर्षे, रा. गुलमोहर नगर चौक, भरतवाडा रोड, कळमना, नागपुर, २) मयुर भुवनेश्वर नागदेवे, वय २५ वर्षे, रा. हनुमान नगर, भाडेवाडी रेल्वे स्टेशन जवळ, नागपुर व ०१ विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकास गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगनमताने त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी क्र. १) अमोल चंद्रशेखर चाफेकर, वय २५ वर्षे, रा. मोचीपुरा, पाचपावली, नागपुर २) गोविंद साखरे, रा. समता नगर, कपीलनगर, नागपुर यांचेसह केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतिरिक्त पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत ईतर ठिकाणी ०१ घरफोडी, पोलीस ठाणे कपीलनगर हद्यीत ०१ घरफोडी व पोलीस ठाणे कळमना हद्दीत ०१ घरफोडी असे एकुण ०४ घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केल्याने, एकूण ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. आरोपींचे ताब्यातुन सोन्याची लगड वजनी १६ ग्राम, चांदीची लगडी वजनी ४२० ग्राम, सोन्याचे मणी,

चांदीच्या वेगवेगळ्या वस्तु व पुखराज खडा असा एकुण ४,५७,३८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा. प्रविण भगत, शेख नजिर, राजेंद्र टाकळीकर, राजु टाकळकर, रूपेश नानवटकर, राजुसिंग राठोड, प्रमोद बावणे, अनीस खान, अमोल भक्ते, चंद्रशेखर गौतम, गणेश ठाकरे, मपोहवा. अनुप यादव, सपना जोशी, पोअं. दिपक बावणकर, विशाल नागभिडे, निलश गायकवाड, सुधीर तिवारी, लिलाधर खिरडकर, रोशन तांदुळकर व आशिष पवार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक २८.०९.२०२६ चे १५.५० वा. चे सुमारास, राणा प्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, कामगार कॉलनी, सुभाषनगर येथील एलेन टयुशन क्लासेस समोर आमरोडवर एक हद्यपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल कृष्णा गाडेकर वय २५ वर्षे, रा. गल्ली क्र. ०९, संत तुकडोजी नगर, सुभाषनगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे

**<u>२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी रोशन मनोहरराव वानखेडे, वय ३१ वर्ष, रा. गाव यावली, ता. जि. अमरावती यांचेकडे गणपती विसर्जनाचा कार्यक्रम असल्याने, त्यांचे जावई नामे निलेश चंदुराम मनवानी, वय ४० वर्ष, रा. मॅक्स ग्लोरी अपार्टमेंट, फ्लॅट क्र. ३००, बेलतरोडी, नागपूर हे व बहिण नामे सौ. सारीका निलेश मनवानी वय ३१ वर्ष व भाचा नामे अभिर मनवानी वय ०५ वर्ष असे दिनांक २८.०९.२०२६ रोजी फिर्यादीकडे आले होते. गणपती विसर्जनाचा कार्यक्रम आटोपुन फिर्यादीचे जावई निलेश हे परिवारासह त्यांचे आय—१० कार क्र. एमएच ४९ सीडी

८८७५ ने नागपूर येथे परत येत असता, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, कार चालविणारे फिर्यादीचे जावई यांचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार रानी कोठीचे जवळील नाल्यात पलटी झाली. अपघातामध्ये कारमधील फिर्यादीचे जावई व भाचा किरकोळ तसेच फिर्यादीची बहिण सारीका ही गंभीर जखमी झाली. जखमींना उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचे बहिणीस मृत घोषित केले. फिर्यादीचे जावई भाचा अभिर यांचा उपचार करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादीचे जावई निलेश यांनी त्यांचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने, त्यांचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार नाल्यात पलटी होऊन, बहिणीचे मृत्युस कारणीभुत झाले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे कारचालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१),३२४(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—१

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये तसेच, रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक ३०.०९.२०२६ रोजी पासून ते दिनांक २९.१०.२०२६ रोजी पर्यंत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—२

वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट, इंदोरा नागपूर शहर हद्दीत महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे पहलवान शाह बाबा दर्गा जवळील मोतीबाग रेल्वे पुलिया येथे स्पॅन P21-P-22 मध्ये (३० मीटर लांब, ५ नगर) तसेच, स्पॅन P22-P-23 मध्ये (३० मीटर लांब, ५ नगर) गर्ड्स टाकण्याचे काम ०९ दिवसात करण्यात येणार आहे. त्याकरीता मोतीबाग रेल्वे पुलियाचे कामादरम्यान त्या ठिकाणाहून वाहतूक वळविणे आवश्यक आहे. सदरच्या भागात दिवस/रात्र व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- कडबी चौकाकडुन मोतीबाग रेल्वे पुलाखालून पुढे जाणारी संपुर्ण वाहतूक ही कडबी चौकातून गड्डीगोदाम चौक, सदर किंवा इंदोरा चौक मार्गे जातील.
- गार्ड लाईन कडुन मोतीबाग रेल्वे पुलिया खालून मोतीबाग कडे जाणारी संपुर्ण वाहतूक ही सी.ए रोडने मेयो हॉस्पीटल चौक मार्गे जातील.
- मोमिनपुरा चौकाकडुन मोतीबाग रेल्वे पुलाखालुन मोतीबाग, कडबी चौकाकडे जाणारी संपुर्ण वाहतूक ही गार्ड लाईन मार्गे मेयो चौकाकडुन पुढे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक ३०.०९.२०२६ रोजी पासून ते दि. ०८.१०.२०२६ रोजी पर्यंत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर